# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **09/05/2020**

**Brief of the work done :-**

मंगरुळपीर येथे बिबे फोडणाऱ्या आदिवासी महिलांना पोलिसांच्या सहकार्यातून मिळाला मदतीचा हात दि. ०९/०५/२०२०



# बिबे फोडणाऱ्या आदिवासी महिलांना आधार

## पोटाची भुक मिटवीण्या करिता महिलांच्या चेहऱ्यावर उबजला बिबा

**मंगरुळपीर** ■ तालुका प्रतिनिधी

तालुक्यातील शेलुबाजार येथून जवळच असलेल्या शेंदुरजना मोरे येथे आदिवासी समाज वास्तव्यास आहे. हे आदिवासी महिला आपल्या पोटासाठी बिबे फोडण्याचे काम करुण आपला उदरनिर्वाह करतात. या आदिवासी महिलांना ७ मे रोजी शेलुबाजार येथील राजमुद्रा ग्रुप, वसुंधरा टिम व महिला बचत गट यांच्या संयुक्त विधमाने जीवनावश्यक वस्तूच्या संपुर्ण किटचे वाटप मंगरुळपीर उपविभागीय पोलिस अधिकारी यंशवत केडगे व स. पो. नि. अजिनाथ मोरे, राजमुद्रा ग्रुपचे पवन राठी, महिला बचत गटाच्या जयश्री लकडे, वसुंधरा टिमच्या तेजेस्विनी काळे यांच्याहस्ते करण्यात आले आहे.

कोरोना व्हायरस सारख्या महामारीच्या या काळामध्ये कोणीही उपाशी राहू नये यासाठी बीबे फोडण्याचे काम करनाऱ्या आदिवासी महिलांपर्यंत राजमुद्रा ग्रुपचे सदस्य पवन राठी यांनी ही मदत पोहचविण्याचे कार्य केले. राजमुद्रा ग्रुप हे कोरोना महामारीच्या काळामध्ये गरजूंना मदत करण्याचे काम करित आहेत. त्यामुळे अनेकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू उमटलेले आपल्याला पहावयास मिळाले. आजच्या काळात महिलांना सौंदर्याचे आकर्षक आहे. महिला मेकअप करतांना आपण पाहिल्या आहेत. परंतु ह्या आदिवासी महिला पोटाची खळगी भरण्याकरिता त्यांच्या चेहऱ्यावर बिबे उबजल्याचे चित्र प्रत्येकाला प्रेरणा देणारे आहे. कोरोना व्हायरसचा या काळात प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवाची काळजी करत आहे. हात धुण्यासाठी विविध जंतुनाशक लिक्विड, डेटॉल, साबण, तसेच सॅनिटाइझर अश्या वस्तूचा वापर करित आहेत. आपल्या पोटाची खळगी कशी भरेल व १७० रु. कसा रोज पडेल. याकडे त्या महिलांचे लक्ष लागलेले आहे. यावेळी मंदाताई, मिना कव्हर, डोफेकर, अतुल इंगोले, ओम उजवने, उमेश ठाकरे, राध्येशाम महल्ले, महादेव झ्याटे, अमोल झ्याटे यांचे सहकार्य लाभले.

❝ राजमुद्रा ग्रुपचे कार्य शेलुबाजार परिसरात उलेखनीय आहेत. यांनी गोरगरिबांची काळजी घेत त्यांना कोरोनाच्या काळात परिपूर्ण मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. आज बिबे फोडून गोळंबी बनवीणाऱ्या आदिवासी महिलांन करिता जी राजमुद्रा ग्रुपने मदत दिली. या सारखी गरजूवंताना मदत देण्याचे कार्य सर्वांनी केल्यास आपण कोरोनाचा खंबिर पणे सामना करु शक्तो.

**यशवंत केडगे**
म. पीर उपविभागीय पोलिस अधिकारी

ePaper देशोन्नती
Sat, 09 May 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/51740549